नियमीत दिवाणी दावा क्र.११/२०२१
भागिरथाबाई वि. उपजिल्हाधिकारी

## नि.क्र. १०० खालील आदेश

**०१.** सदरचकामी वादीने स्वत: अर्ज देवून नमूद केले की, त्यांचे पुर्वीचे वकिलांना त्यांनी ठरविल्याप्रमाणे संपुर्ण फी दिली असून ते प्रकरणात गैरहजर राहतात, न्यायालयातील कामाची माहिती देत नाहीत व पुर्तता करीत नाहीत याबद्दल त्यांची भेट घेतली असता त्यांनी आणखी पैसे मागितले अन्यथा प्रकरण चालविणार नाही आणि नाहरकतही देणार नाही असे सांगितले. नि.क्र.५० वर प्रकरण रद्द करण्यावर ठेवले आहे. त्याला पुर्वीच्या वकिलांची गैरहजेरी कारणीभूत आहे. त्यामुळे, प्रकरण खारीज झाल्यास वादीचे नुकसान होईल, तिला नवीन वकील नेमण्यासाठी परवानगी असावी अशी विनंती केली आहे.

**०२.** प्रतिवादीने दिलेल्या म्हणण्यानुसार दावा जूना असून जाणिवपुर्वक वादी तो चालविण्यास उशीर करते. अर्जासोबत शपथपत्र नाही. वादीने वकिलाविरुध्द गंभीर आरोप केले आहेत. त्यामुळे, अर्ज नामंजूर व्हावा अशी विनंती केली.

**०३.** याकामी वकिल आणि पक्षकार यांच्यातील संभाषण किंवा त्यांच्यातील संबंधाबाबत न्यायालयास जाणून घेण्याची ईच्छा नाही. मात्र, प्रकरण प्रलंबित असल्याने ते पुढे सरकने आवश्यक आहे.

**०४.** पक्षकाराला स्वत:च्या ईच्छेने स्वत:च्या मर्जीचे वकील देण्याचा पुर्ण अधिकार आहे. त्यामुळे, पुर्वील वकिलांची संमती किंवा नाहरकत प्रमाणपत्र अशी संकल्पना अस्तीत्वात नाही. वकिली व्यवसायातील शिष्टाचारांचा तो भाग आहे. न्यायालयास अशा प्रकारची संकल्पना बंधनकारक नाही. एकाच प्रकरणात दोन वेगवेगळे वकील एकाच पक्षकाराची बाजू मांडून गोंधळाची परिस्थिती निर्माण होवू नये म्हणून केलेली ती नियमावली आहे. ती वकिलांवर बंधनकारक आहे, न्यायालयावर नाही. याकामी मा.सर्वोच्च न्यायालयाने व्ही.सी.रंगा दुराई वि. डी.गोपालन (१९७९)१ एस.सी.सी.३०८ मधील सारांशानूसार

“A client has a freedom to change their counsel if that trust is breached. An advocate cannot hold the brief hostage or insist on continuing if the client no longer wishes to engage them.” असे नमूद केले आहे.

**०५.** तसेच, आर.डी.सक्सेना वि. बलरामप्रसाद शर्मा (२०००)७ एस.सी.सी.२६४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने विश्लेषीत केलेल्या निकालाचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

“If an advocate cannot even withhold papers for unpaid fees, they certainly cannot prevent a client from engaging a new advocate in a subsequent matter by withholding consent. The court noted that, “A litigant must have a freedom to change his advocate when he feels that his interest will be better served by another advocate.” असे नमूद केले आहे.

**०६.** तामिळनाडू वीज मंडळ वि. एन.राजू रेड्डीआर (१९९६)४ एस.सी.सी.५५१ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले आहे की, “The practice of requiring an N.O.C. is a matter of professional etiquette. It is not a substantive law that bars a client from hiring someone else for a new or subsequent matter.”

**०७.** वर नमूद निकालांचा आधार घेवून प्रस्तुत प्रकरणी वादीने आपल्या ईच्छेने वकिलांची नेमणुक करावी आणि प्रस्तुत वाद पुढे सरकवावा. वादी हिचा अर्ज पाहता, तो मंजूर करताना तिला दंड करणे किंवा प्रतिवादीला कॉस्ट देणे हे वादीवर अन्यायकारक होईल. तसेच याकामी वादीची ओळख घालण्यासाठी तिचे वकीलच उपलब्ध नसल्याने तिने शपथपत्र सादर केलेले नाही. त्यामुळे, त्याबद्दलचा आक्षेप फेटाळण्यात येतो.

**०८.** वर नमूद कारणांचा विचार करता अर्ज मंजूर करण्यात येतो.

स्वाक्षरीत/-

**दिनांक ०८/०४/२०२६.**

**[एस.एन.सरडे]**

दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.